IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सांप्रदायिकतेचे राजकारण व महात्मा गांधीचे राजकीय विचार

**डॉ. बी. बी. लोखंडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा जिल्हा बीड

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
सांप्रदायिकता
भारतीय राजकारण

**ABSTRACT**

ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत सांप्रदायिकता भारतातील एक प्रमुख समस्या बनलेली आहे. स्वातंत्र्यानंतरही या समस्येने भारतीय विविधतेला विळाखा घातलेला दिसून येतो. Communalism या संकल्पनेला मराठीत जमातवाद अथवा संप्रदायिकता असे ही शब्दप्रयोग वापरले जातात. धार्मिक मुलतत्त्ववाद या अंगानेही सांप्रदायिकतेचा अभ्यास केला जातो. सर्वसामान्यांची रुढी प्रियता धर्मभोळेपणा याचा वापर करुन एखादा धार्मिक समुदाय दुस-या धार्मिक समुदायाविरुद्ध धर्माच्या आधारावर संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो तेंव्हा सांप्रदायिकतेचा जन्म होतो. यातूनच धर्माचे राजकारण आकार घेते. थोडक्यात सांप्रदायिकता म्हणजे दोन समुदायामध्ये धर्माच्या आधाराने संघर्ष निर्माण होणे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Lokhande, B. B. (2025). सांप्रदायिकतेचे राजकारण व महात्मा गांधीचे राजकीय विचार. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 320–324.

**प्रस्तावना:**

भारतात सांप्रदायिकतेचा विचार प्रामुख्याने राजकाणाच्या संदर्भात केला जातो. त्यामुळे सांप्रदायिकतेच्या सामाजिक पार्श्वभूमीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. हिंदू मुलतत्त्वादी असोत किंवा मुस्लिम मुलतत्ववादी असोत. ते सांस्कृतिक कार्य या नावाखाली सांप्रदायिक राजकारणाला जन्म देतात. या पार्श्वभूमीवर भारतात आज संप्रदायवादाने उग्र स्वरुप धारण केले आहे. भारतातील हिंदू तसेच मुस्लिम समाजाने सांप्रदायिकतेला सतत सामाजिक, राजकीय, आर्थिक आधार प्राप्त करुन दिले आहेत. त्याच प्रमाणे वैचारिक आणि सांस्कृतिक भूमी उपलब्ध करुल दिली आहे. विशेषत: निवडणूकीच्या काळात जनतेला सांप्रदायिक आवाहाने करुन भावनिक बनवले जाते त्यामुळे सांप्रदायिकता किंवा संप्रदायवाद भारतीय राजकारणात चर्चेचा विषय ठरला आहे. सांप्रदायिक राजकारणाने लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवली आहेत. त्यामुळे सामाजिक सलोखा, विश्वास, इतर धार्मिक भावनांचा अनादर, हिंसाचाराच्या घटनामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे. एका संप्रदायाने  इतर संप्रदायाप्रती उपेक्षा, उदासिनता, घृणा, विरोध आणि आक्रमणाची भावना वृद्धींगत करणे म्हणजे सांप्रदायिकता होय. याचा आधार वास्तविक व काल्पनिक भय व शंक निर्माण करणे आहे. जो संप्रदाय इतर संप्रदायाच्या जनतेप्रती धर्म, भाषा, संस्कृती इत्यादीच्या आधारावर नुकसान पोहचवतो, असहिष्णूतेची भावना बाळगतो किंवा धार्मिक भिन्नतेच्या आधारावर आपल्या समुदायाला राजकीय अधिकार, अधिकची सत्ता व प्रतिष्ठेची मागणी करतो, तसेच तो राष्ट्रीय हितापेक्षा सांप्रदायिक हिताला प्राथमिकता देतो. धार्मिक अंद्धश्रद्धा, असहिष्णूता, इतर धर्माबद्दल द्वेष, दुष्प्रचार, हिंसा व संघर्ष इत्यादींना सांप्रदायिकतेत उत्तेजन दिले जाते आणि यामुळे राजकारण मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर 1947 मध्ये महात्मा गांधीजी म्हणाले होते की, ‘धर्म किंवा जाती विभागाचा सिद्धांत एकदा स्विकारला तर पुढे विभाजनाची प्रक्रिया अधिक वाढत जाईल.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणत्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.सदरील संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्री वापरण्यात आली आहे.

**सांप्रदायिकता :**सांप्रदायिकता हा शब्द असा आहे की, जो भारतीय पार्श्वभूमीवर समस्याप्रधान आणि दुर्दैवी बनला आहे. पाश्चात्य देशामध्ये हा शब्द सामुदायिक आधार आणि बंधुता यासाठी वापरला जातो. पाश्चात्य समाजामध्ये सांप्रदायिकता एक विचारधारा म्हणून नावारुपास आलेली आहे. तिचा उद्देश आपलेपणाची भावना, परस्पर मदतीची भावना पुर्नसंचयित करणे हा आहे. शेवटी पाश्चात्य समाजात हा शब्द सकारात्मक स्वरुपात वापरला जातो. भाषाशास्त्राच्या दृष्टीकोनातून क्दृश्श्द्वदठ्ठथ्त्द्मथ्र् हा इंग्रजी शब्द क्दृश्श्द्वदत्ॠ या  शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ एकत्र राहणे असा आहे. परंतु भारतीय समाजाच्या विशिष्ट परिस्थितीमुळे येथे सांप्रदायिकता म्हणजे एका संप्रदायाने इतर संप्रदायाप्रती उदासिनता, घृणा,उपेक्षा, विरोध व आक्रमणाची भावना वृदिं्धगत करणे होय. ज्याचा आधार वास्तविक किंवा काल्पनिक भिती आहे एक संप्रदाय दुस़्या संप्रदायाचा नाश करण्यासाठी किंवा जीवित व मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी कटीबद्ध असतो म्हणून सांप्रदायिकता हा शब्द भारतामध्ये नकारात्मक अर्थाने वापरला जातो.

**महात्मा गांधीजीचे विचार :**

भारताच्या स्वराज्यासाठी महात्मा गांधीजींनी दिलेला तीन दशकांचा लढा हा सं ाप्रदायिक एकतेचा होता. भारतासारख्या बहूधार्मिक देशात सर्वधर्मसमभाव ही भावना व्यवहारिक जीवनात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न

केले. गांधी म्हणत असत की, आपण धर्माने वेगळे असू शकतो पण राष्ट्र म्हणून आपण सगळे एक असलो पाहिजे. त्यांनी सर्व धार्मिक समुदायांना व राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता सूचवली होती. याअंतर्गत त्यांनी राजकीय पक्षांना कोणत्याही अल्पसंख्याक समाजाला मतपेटी म्हणून बघु नका किंवा राजकीय स्वार्थासाठी त्यांच्या भावनांचे शोषण करु नका असे त्यांनी सांगितले होते. महात्मा गांधी हे हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रखर पुरस्कर्ते होते. हिंदू आणि मुस्लिम यांच्यात बंधुभाव आणि सौहार्दाची भावना विकसीत करणे हे गांधीजींचे मुख्य उद्दिष्टे होते. सांप्रदायिक सलोख्याचे मुळ नक्कीच हिंदू-मुस्लिम ऐक्यात आहे. परंतु हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अर्थ केवळ हिंदू आणि मुस्लिमांमध्ये ऐक्य असा नाही तर गांधी या मुद्दावर आपले मुलभूत मत व्यक्त करताना म्हणतात की, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अर्थ त्या सर्व लोकांमधील एकतेशी आहे. जे मानतात की, भारत हे त्यांचे घर आहे. या लोकांची तुलना गांधीजी एका पक्षाचे दोन पंख व भारतमातेच्या दोन डोळ्यांशी करतात व गांधीजींना या लोकांनी एकमेकांसोबत शांततापूर्ण, बंधुभावाने, परस्पर सहकार्याने, परस्पर सहिष्णुतेने, प्रेम व आपुलकीने वागावे असे वाटत होते. म्हणून गांधीजींनी वैचारिक व राजकीय चिंतनाबरोबर प्रत्यक्ष दंगलग्रस्त भागात जाऊन दंगल थांबविण्यासाठी ही त्यांनी प्रयत्न केले होते.गांधीजींचा असा विश्वास होता की, सांप्रदायिकता केवळ देश विरोधी नाही तर हिंदू सांप्रदायिकतेच्या बाबतीत हिंदू विरोधी आणि मुस्लिम सांप्रदायिकतेच्या बाबतीत मुस्लिम विरोधी आहे. त्यांचा असा विश्वास होता की, “हिंदूना मारुन मुस्लिम इस्लाम ची सेवा करणार नाहीत तर ते त्याचा नाश करतील आणि जर हिंदूना वाटत असेल की, ते इस्लामचा नाश करतील, तर त्याचा अर्थ हिंदूचा नाश करणे असा होईल. हिंदू आणि मुस्लिम वेगवेगळया धर्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांचे राजकीय आणि आर्थिक हितसबंध वेगळे होतात. या सांप्रदायिक मताचेही त्यांनी खंडण केले.गांधीजींचा ठाम विश्वास होता की, कोणताही खरा धर्म एकमेकांचे गळे कापण्यासाठी प्रवृत्त करत नाही. माणसांना एकमेकांपासून वेगळे करण्यासाठी धर्म नाही, तर त्यांना एकमेकांशी प्रेमाने बांधण्यासाठी आहे. हे दुर्देव आहे की धर्माला एवढे विकृत केले आहे की तो दंगलीचे आणि परस्पर खुनाचे प्रभावी कारण बनला आहे. गांधीजी म्हणतात की, हिंदू आणि मुस्लिम यांचे भांडणाचे आणखी एक कारण म्हणजे त्यांना त्यांची मते व विचार एकमेकांवर लादायची आहेत. गांधीजींच्या मतानुसार सहिष्णुता हे ख��या धार्मिक भावनेचे अध्यात्मिक लक्षण आहे. हिंदू आणि मुस्लिमांनी सहिष्णुता हे त्यांचे धर्म कर्तव्य म्हणून पालन करावे अशी त्यांची इच्छा होती. गांधीजी म्हणतात की, सहिष्णुता हे आपले ध्येय असायला पाहिजे. सहिष्णुता हे अहिंसा धर्माचे मुळ आहे त्याच प्रमाणे सत्याचेही मुळ आहे. देवाप्रमाणे (ईश्वरासारखे) सत्याचेही अनेक रुपे आहेत कारण मला आवडणा��या सत्याच्या रुपाला मी योग्य म्हणू शकत नाही आणि इतरांना आवडणारे रुप चुकीचे म्हणू शकत नाही. खरा धर्म हा एकच आहे. पण माणसाच्या माध्यमातून तो अनेक धर्मात विभागला जातो. (चुकीची) सदोष व्यक्ती धर्माबद्दल अभिव्यक्ती (वक्तव्य) देते आणि तितकीच सदोष व्यक्ती त्या शब्दांचा अर्थ काढते. कोणाची समज बरोबर आहे? आपआपल्या दृष्टिकोनातून प्रत्येकजण बरोबर आहे. म्हणून सहिष्णुतेची आवश्कता आहे. याचा अर्थ असा नाही की, आपण आपल्या धर्माबद्दल उदासीन असले पाहिजे, परंतू आपल्याला धर्माबद्दल अधिक समज आणि शुद्ध प्रेम असले पाहिजे. सहिष्णुता आपल्याला एक आंतरिक दृष्टी देते. ती दृष्टी धर्माधंतेपासून जितकी दूर आहे.तितकीच उत्तर ध्रुव हा दक्षिण ध्रुवापासून दूर आहे. धर्माचे खरे ज्ञान सांप्रदायिक भेद दूर करत दुस��या संप्रदायाच्या प्रती दाखवलेल्या औदार्याने आपल्याला आपल्या (पंथाचे) संप्रदायाचे योग्य अर्थ, योग्य ज्ञान मिळते. जगातील सर्व प्रमुख धर्म एकाच मुल तत्त्वावर आधारित आहेत. सर्व धर्मांनी महान संत निर्माण केले आहेत.

गांधीजींचा असा विश्वास होता की, हरुन-अल-रशीद आणि मामुन यांच्या काळात इस्लाम हा जगातील सर्वात उदारमतवादी सहिष्णु धर्म होता. पण त्या काळातील धर्मोपदेशक आणि तत्त्वज्ञ यांच्या औदार्याला विरोध होता. त्या आंदोलकांमध्ये अनेक प्रभावशाली आणि सक्षम लोक होते. ज्यामुळे उदारमतवादी घटकांचा पराभव झाला. गांधीजी म्हणातात,"आपण भारतात त्याच प्रतिक्रियाचा परिणाम भोगत आहोत पण मला पूर्ण विश्वास आहे की, इस्लाम स्वत: ही असहिष्णुता नष्ट करण्यास सक्षम आहे." गांधीजीच्या मते अहिंसा, धार्मिक भावना आणि सांप्रदायिक एकता यांच्यात परस्पर संबंध आहे. हिंसक पद्धती पेक्षा अहिंसक पद्धतीसाठी अधिक तयारी आवश्यक आहे. पहिली गरज म्हणजे देवावर सक्रिय विश्वास असणे अशी श्रद्धा असणारा माणूस ओठावर भगवंताचे नामस्मरण करताना कोणतेही वाईट काम करत नाही. तो तलवारीवर नाही तर देवावर विश्वास ठेवतो. पण भ्याडपणा हा अहिंसेपेक्षा वेगळा आहे. देवाच्या ख[illegible] भक्तांना तलवार चालवण्याची क्षमता असते, पण तो तलावर चालवत नाही. कारण त्याला माहित असते की, प्रत्येक माणसामध्ये देवाची मूर्ती असते. दूसरी गरज वैश्वीक बंधुत्वाची आहे. इस्लाम धर्म मानवाच्या बंधुतत्त्वार विश्वास ठेवतो याचा अर्थ केवळ मुस्लीमांचा बंधुभाव नाही तर संपूर्ण मानवतेचा बंधूभाव आहे. ईश्वरावर श्रद्धा असणे म्हणजे विश्वबंधुतत्त्वाचा अंगीकार करणे होय. सर्व धर्मांचा समान आदर हा त्याचा दूसरा अर्थ आहे. तिसरी गरज म्हणजे सत्य आणि शुद्धता. गांधीजींसाठी देवावर सक्रिय विश्वास असणे म्हणजे शुद्ध (पवित्र) आणि सत्यवादी असणे. गांधीजींचा सांप्रदायिक ऐक्य विशेषत: हिंदू मुस्लीम ऐक्याचा भर कोणत्याही राजकीय हेतूसाठी नव्हता. प्रेम किंवा अहिंसेने सत्याचे शुद्धीकरण करणे हा त्यांचा एक प्रयत्न होता. गांधीजींचा नेहमी असा विश्वास होता की, हिंदू मुस्लिम दोघांनीही एकमेकांच्या धर्माबद्दल जाणून घेतले पाहिजे तरच संबंध चांगले होऊ शकतात. हिंदूनी 'कुराण' वाचले पाहिजे त्यात असंख्य गोष्टी आहेत ज्या हिंदूना मान्य आहेत. त्याचबरोबर मुस्लिमांनी भग्वतगीता देखील वाचली पाहिजे ज्यात असंख्य उदाहरणे आहेत. जी कोणताही मुस्लिम दूर्लक्ष करु शकत नाही. त्यांचा असा विश्वास होता की, "हृदयाची एकता" सांप्रदायिक ऐक्याच्या केंद्रस्थानी आहे. महात्मा गांधीजीचे हे विचार सांप्रदायिकतेच्या दुषीत वातावरणात समाजाच्या समतावादी स्थैर्यासाठी तसेच धार्मिक सहिष्णूतेसाठी अपरिहार्य आहेत म्हणून देशाला महात्मा गांधीजींच्या विचारांचे आचरण आवश्यक वाटते.

**सारांश**

देशात मागील काही दशकांपासून सांप्रदायिकता हा शब्द प्रयोग हिंदू-मुस्लिम दंगली, धर्माधिष्ठित राष्ट्रवाद, धार्मिक मुलतत्ववाद इत्यादी समस्यांच्या अनुषंगाने वापरला जातो. धार्मिक संघटनांचे राजकारण, राजकीय पक्षांच्या सांप्रदायिक भूमिकांचा वापर करण्याची वाढती प्रवृत्ती इत्यादी अनेक घटकांचा परिणाम देशात सांप्रदाकियतेचा अतिरेक होवून या देशातील सामाजिक सहजीवन हे भयभीत झाले आहे. म्हणून गांधीजींनी पाहिलेल्या हिंदू-मुस्लिम एकतेच्या स्वप्नांना तडा जातो आहे व समाजात असहिष्णुतेचे वातावरण निर्माण होऊन हिंसेला प्राधान्य मिळाताना दिसत आहे. म्हणून समाजाच्या एकतेसाठी व धर्मनिरपेक्षतेच्या संतुलित राजकारणासाठी गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता अपरिहार्य वाटते आहे.

## संदर्भ सूची

१) चन्द्रा, विपिन.(2013). सांप्रदायिकता एक प्रवेशिका. नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नई दिल्ली. तीसरी आवृत्ती.

२) चंद्र, बिपिन.मुखर्जी,मृदुला. मुखर्जी, आदित्य. पानिकर, क.न. महाजन, सुचेता. (2015). भारत का स्वतंत्रता संघर्ष. हिन्दी माध्यम कार्यान्वय निर्देशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली. 39 वी आवृत्ती.

३) भोळे, भा.ल. (2015). भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण. पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर.

४) गांधी, मो.क. (अनु) पटवर्धन, सी.पु. (2018). सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा. साकेत प्रकाशन, औरंगाबाद. चौथी आवृत्ती.

५) पळशीकर, सुहास. (2019). राजकारणाचा ताळेबंद. साधना प्रकाशन, पुणे. चौथी आवृत्ती.

६) फिशर, लुई. (अनु) जोगळेकर, वि.रा. (2019). महात्मा गांधी:जीवन व कार्यकाळ. साधना प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती.

७) थरुर, शशी. (अनु)- पुरी ,प्रतिक. (2019). द पॅराडॉक्सिकल प्राईम मिनिस्टर. मधुश्री पब्लिकेशन, नाशिक. प्रथम मराठी आवृत्ती.